महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम
<u>१९८२ मधील नियमांबाबतचे स्पष्टीकरण</u>
अतिरिक्त खुलासा

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः सेनिवे १००८/९६/ सेवा-४,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १ जुलै,२०१०

संदर्भ : शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक सेनिवे १००८/९६/ सेवा-४,दिनांक ३ नोव्हेंबर २००८.

<u>परिपत्रक</u>

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मध्ये करण्यात आलेल्या तरतूदीनुसार शासकीय कर्मचाऱ्याचे निवृत्तिवेतन/कुटूंबनिवृत्तीवेतन व अनुषंगीक बाबी विनियमित करण्यात येतात. तथापि या नियमातील काही तरतूदींच्या नियमास अभिप्रेत अर्थाबाबतचे स्पष्टीकरण संदर्भाधिन दिनांक ३ नोव्हेंबर,२००८ च्या परिपत्रकान्वये करण्यात आले आहे. या परिपत्रकातील अ.क्र.९,१०,११,१२, व १६ मध्ये केलेला खुलासा नियम १११, ११६ व १३० मधील मृत्यु उपदान/ कुटुंब निवृत्तीवेतन/सेवा उपदानासंदर्भातील आहे.

२. एखाद्या कर्मचा-याने पहिली पत्नी हयात असताना तिच्याबरोबर कायदेशीर घटस्फोट न घेता केलेला दुसरा विवाह हा हिंदु विवाह कायद्यानुसार बेकायदेशीर ठरतो. त्यामुळे त्याच्या द्वितीय पत्नीस कायदेशीर पत्नीचा विधीवत दर्जा प्राप्त होत नाही व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियमांनुसार अशा पत्नीस कुटुंब निवृत्तीवेतन अनुज्ञेय नाही. तथापि बहुतांश प्रकरणात संबंधित दोन्ही पत्नींना न्यायालयाकडून वारसा प्रमाणपत्र प्राप्त होते व त्याआधारे त्या कुटुंब निवृत्तीवेतन/मृत्यु उपदानाची मागणी प्राप्त होते. अशा प्रकरणात महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम १११ व ११६ च्या तरतुदींसंदर्भात संदर्भाधिन दि.३.११.२००८ च्या परिपत्रकामध्ये दिलेल्या खुलाशानुसार कायदेशीर पत्नीसच कुटुंब निवृत्तीवेतन देय ठरते. तथापि असे निदर्शनास आले आहे की, बहुतांश प्रकरणात प्रथम पत्नीकडून विवाहाचे प्रमाणपत्र प्राप्त होत नसल्याने कर्मचा-याच्या मृत्युनंतरही बराच कालावधी लोटला तरी त्याच्या कुटुंबीयांना कुटुंब निवृत्तीवेतन मिळत नाही. कुटुंब निवृत्तीवेतन मंजूर करण्यामागची शासनाची भूमिका विचारात घेता त्यापासून कर्मचा-याचे कुटुंबीय वंचित राहू नये याकरिता त्यामुळे दि.३.११.२००८ च्या परिपत्रकातील अ.क्र.९,१०,११ व १२ संदर्भात केलेल्या स्पष्टीकरणामध्ये खालीलप्रमाणे अतिरिक्त खुलासा करण्यात येत आहे:

"तथापि अशा प्रकरणात न्यायालयाकडून आदेश प्राप्त झाले असल्यास व त्या आदेशांना वरिष्ठ न्यायालयात आव्हान देण्यात आले नसल्यास न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी."

३. संदर्भाधिन दिनांक ३.११.२००८ च्या परिपत्रकातील अ.क्र.१६ मध्ये नियम १३० नुसार तात्पुरत्या उपदानासंदर्भातील स्पष्टीकरण देण्यात आले आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे अतिरिक्त खुलासा करण्यात येत आहे:

" जेथे म.ना.से.(शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम १० अन्वये त्या नियमातील नियम ५ मधील खंड १ च्या उपखंड १,२ व चार मध्ये नमूद केलेल्या किरकोळ शिक्षांपैकी एखादी शिक्षा बजावण्यासाठी विभागीय चौकशी सुरु केली असेल तेथे उपदानाचे प्रदान प्राधिकृत करण्यात यावे.

४. सदर परिपत्रकाव्दारे करण्यात आलेला अतिरिक्त खुलासा विचारात घेऊन विभागानी कार्यवाही करणे अपेक्षित आहे. या मुद्दयांबाबत वित्त विभागाकडे संदर्भ करण्यात येऊ नये.

d/deepa/amend

५.	सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१००७०११५०४४५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ.मु.सोलेगांवकर

अ.मु.सोलेगांवकर
शासनाचे सह सचिव.

प्रति,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१००० प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई (२५ प्रती),
संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,(१० प्रती)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),
उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १०प्रती),
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),
सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
*विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
*प्रबंधक,, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा) मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा),मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई/नागपूर/औरंगाबाद
मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)
सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १ला मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
कार्याध्यक्ष, महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन, १४४९, सदाशिव पेठ, 'संकल्प' खजिना महाल बोळ, एस.पी.कॉलेज समोर, पुणे ४११ ०३०
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
मंत्रालयातील सर्व विभाग,
महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१००० प्रती)
महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५प्रती),
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),
सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),
संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),
कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),
कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ , परभणी (१० प्रती),
कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),
कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),
कुल सचिव, महाराष्ट्र पशु विज्ञान विद्यापीठ, नागपूर (१० प्रती),
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे, जिल्हा रायगड (१० प्रती),
बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक नं. १,योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक,नरिमन पॉईंट , मुंबई २०
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड,, मुंबई ४
भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी , मुंबई १३
इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५
नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई २१
शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २८
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

***पत्राद्वारे.**

d/deepa/amend